# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २७४ - २३** **दिनांक : - २२/०८/२०२३**

## जबरी चोरी व रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन ३ गुन्हांची उकल करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. ०९/०८/२०२३ रोजी रात्रौ ००.३० वा. ते सकाळी ०६.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी श्री. भानुचंद्र रामचंद्र यादव यांची रिक्षा हि गोपाल पाटील यांचे शिवसेना ऑफिस समोर, बिलालपाडा, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर येथे सार्वजनिक रोडवर पार्क करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे संमतीशिवाय चोरी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांविरुध्द पेल्हार पो.स्टे गु.रजि.नं. ७४०/२३ भा.द.वि. ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तसेच पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५/०८/२०२३ रोजी सांयकाळी ०७.३० वा. चे सुमारास फिर्यादी मुकेशकुमार अभिमन्यु राजपुत हे वाकनपाडा भाजी मार्केट, जवळ नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर भाजी खरेदी करणेसाठी गेले असता त्यांचे समोरुन चालत येणा-या एका अनोळखी इसमाने त्यांचे शर्टच्या खिशात ठेवलेला मोबाईल फोन त्यांचे संमतीशिवाय जबरदस्तीने खेचुन घेवुन चोरुन पळून गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. ७६१/२०२३ भा.द.वि.स. कलम ३९२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद दोन्ही गुन्हयाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना तांत्रिक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे १) **अरबाज इस्माईल मेमन, वय- २३ वर्ष** रा. मालवणी, मालाड, मुंबई २) **राजीव रामचंद्र तिवारी, वय- ३४ वर्षे**, रा. पेल्हार, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर, ३) **गंगाधर राजकुमार मिश्रा, वय-३५ वर्षे**, रा. संतोषभवन, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर याना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले.तसेच त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांचेकडून चोरीस गेलेल्या बजाज कंपनीच्या दोन रिक्षा व एक मोबाईल फोन असा एकुण ९१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन पेल्हार पोलीस ठाणे अभिलेखावरील एकुण ३ गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

१) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७४०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
२) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७६१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२ प्रमाणे.
३) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ६६९/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. सोपान पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.